श्री मुकुंद भवन ट्रस्ट आणि विवेक स्पार्क फाऊंडेशन संचलित

सत्यमेव जयते

# SPARC Academy

# UPSC | MPSC

## मार्गदर्शन आणि प्रशिक्षण केंद्र

## वार्षिक अहवाल - 2025 -2026

# प्रस्तावना

दि. २ जून २०२२ रोजी स्थापन झालेली SPARC Academy ही संस्था स्पर्धा परीक्षांच्या क्षेत्रात गुणवत्ता, शिस्त आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांवर आधारित कार्य करत आहे. प्रशासकीय सेवेत उल्लेखनीय कामगिरी करून समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्याचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अकॅडमी सातत्याने मार्गदर्शनाचे कार्य करीत आहे.

विशेषतः ग्रामीण भागातील, आर्थिकदृष्ट्या दुर्बल तसेच गुणवंत विद्यार्थ्यांना योग्य दिशा, दर्जेदार मार्गदर्शन आणि स्पर्धात्मक वातावरण उपलब्ध करून देणे हा अकॅडमीचा मुख्य उद्देश राहिला आहे. UPSC, MPSC तसेच विविध स्पर्धापरीक्षांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, अभ्यासाची सवय आणि सेवाभाव विकसित करण्यासाठी विविध शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आले आहेत . विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकसनासाठी पूरक असे महत्वाचे सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम देखील घेण्यात आले.
अल्पावधीतच SPARC Academy ने अनेक विद्यार्थ्यांच्या यशामध्ये महत्त्वपूर्ण योगदान देत विश्वासाई मार्गदर्शन केंद्र म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे. नियमित वर्ग, मुलाखत बॅच, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, प्रेरणादायी व्याख्याने, अधिकारी संवाद आणि वैयक्तिक समुपदेशन अशा विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अकॅडमी कटिबद्ध आहे.

हा वार्षिक अहवाल एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ कालावधीतील अकॅडमीच्या कार्याचा, उपक्रमांचा आणि विद्यार्थ्यांच्या यशस्वी प्रवासाचा आढावा मांडण्याचा एक प्रयत्न आहे.
भविष्यातही अधिकाधिक विद्यार्थ्यांना सक्षम प्रशासकीय अधिकारी बनविण्यासाठी SPARC Academy सातत्याने कार्यरत राहील, हा विश्वास व्यक्त करीत हा अहवाल सादर करीत आहोत!



# सुवार्ता...




✦एमपीएससी राज्यसेवा (राजपत्रित) २०२३ परीक्षेतून वर्ग अ, ब पदासाठी आपल्या २३ विद्यार्थ्यांची निवड झाली.

✦(स्पार्क अकॅडमीची मुलाखत बॅच, लेक्चर्स आणि अभ्यासिका अशा विविध उपक्रमांचे लाभार्थी)



आपल्या स्पार्क अभ्यासिकेचे विद्यार्थी प्रदीप भंडारे यांची UPSC २०२४ परीक्षेतून IFS (भारतीय वनसेवा) पदी निवड झाली आहे. (AIR 90)

**स्पार्क अकॅडमी तर्फे हार्दिक अभिनंदन....**





✦आपल्या अभ्यासिकेचे विद्यार्थी रमेश पाटील यांची विद्युत सहायक आणि प्रथमेश होळकर यांची ग्रामसेवक पदी निवड झाल्याबद्दल स्पार्क अकॅडमी तर्फे हार्दिक अभिनंदन....



रमेश पाटील



प्रथमेश होळकर

# सत्कार समारंभ




स्पार्क अकॅडमीच्या तृतीय वर्धापन दिनानिमित्त दि. १ जून २०२५ रोजी MPSC राज्यसेवा २०२३, गट ब, गट क आणि UPSC 2024 मधून यशस्वी झालेल्या स्पार्क अकॅडमीच्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.




**माणसं पैशाने मोठी असण्यापेक्षा कर्तृत्वाने मोठी असावीत...**

**कार्यक्रमाचे अध्यक्ष**

**मा.श्री.प्रवीण दीक्षित सर**

**(माजी पोलीस महासंचालक)**

## अडथळेच तुमच्या उज्ज्वल भविष्याची यशोगाथा लिहीत असतात...




### कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी

**मा.श्री.संतोष राऊत सर**

**(खाजगी सचिव**
**मा.मंत्री मत्स्यव्यवसाय व बंदरे)**

### कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना

**महेश पोहनेरकर**

**(संचालक स्पार्क अकॅडमी) -**

दुर्बल घटकातील आणि योग्य मार्गदर्शनाअभावी प्रशासनात येण्याची संधी न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी स्पार्क अकॅडमीची स्थापना करण्यात आली..







### याप्रसंगी स्पार्क अकॅडमीच्या वार्षिक अहवाल २०२४-२५ चे प्रकाशन करण्यात आले

# मान्यवरांच्या हस्ते यशवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला













यशवंत विद्यार्थ्यांचे पालक आणि
कुटुंबियांचा सन्मान
करण्यात आला.















## स्वार्थाचा आजार झालेल्यांची संख्या वाढतेय

राष्ट्रसंचार
मंगळवार ३ जून २०२५

## पैशाने मोठे होण्यापेक्षा कर्तृत्वाने मोठे व्हा : प्रवीण दीक्षित

## 'स्पार्क ॲकॅडमी'च्या गुणवंतांचा सत्कार

महाराष्ट्र टाइम्स

## 'कर्तृत्वाने मोठे होण्याची गरज'

"आपण माणूस आहोत आणि आपल्यातील माणुसकी जिवंत राहण्यासाठी प्रयत्नशील असणारी प्रत्येक व्यक्ती मोठी असते. वयाने आणि पैशाने मोठ्या होण्यापेक्षा कर्तृत्वाने मोठे होणे आवश्यक आहे.
- प्रवीण दीक्षित, माजी पोलिस महासंचालक









**दि. २६ जून २०२५ रोजी छत्रपती शाहू महाराज जयंती - सामाजिक न्याय दिनानिमित्त ॲडव्होकेट रिषभ परदेशी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.**

## व्याख्यानातील काही ठळक मुद्दे :

✦सामाजिक न्याय म्हणजे नेमक काय ?

✦विशिष्ट कलमे आणि घटना दुरुस्ती.

✦समाजातील विविध घटना आणि प्रत्यक्ष उदाहरणे .

✦PIL संकल्पना

# स्पार्क अकॅडमी

## एक नवीन पाऊल...










सध्या स्पर्धा परीक्षा क्षेत्रामध्ये सगळीकडे ॲपच्या माध्यमातून ऑनलाईन शिक्षण सुरू आहे. स्पार्क अकॅडमीने देखील विद्यार्थी सुलभ मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यासाठी क्लास प्लस कंपनीच्या माध्यमातून SPARC ACADEMY हे APP सुरु केले आहे. दिनांक ९ एप्रिल २०२५ रोजी हे ॲप लॉन्च करण्यात आले.




- ॲपच्या माध्यमातून अकॅडमीचे विविध कोर्सेस, बॅचेस विद्यार्थ्यांना सहज उपलब्ध झाले आहेत.
- विद्यार्थ्यांचा डाटाबेस उपलब्ध होईल.
- विद्यार्थी त्यांच्या सोईच्या वेळेत, सोईच्या गतीने लेक्चर्स पाहू शकतील.

# स्पार्क अकॅडमी New Courses २०२५-२६

✦MPSC २०२५ आणि २०२६ साठी स्पार्क अकॅडमी App वर अल्प शुल्कामध्ये विविध Courses उपलब्ध केले आहेत.
✦ऑनलाइन आणि रेकॉर्डेड स्वरूपात.















# MPSC राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२५
# Strategy Lecture Series

- ✦ राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२५ नवीन अभ्यासक्रम आणि नवीन परीक्षा पद्धतीनुसार
- ✦ सामान्य अध्ययन पेपर १ ते ४
- ✦ उत्तर लेखन कौशल्य
- ✦ निबंध लेखन कौशल्य
- ✦ मोफत Lecture Series Youtube चॅनेल वर





















# MPSC गट ब आणि गट क परीक्षा २०२५
# Orientation & Strategy Lecture Series

✦ राज्यसेवा गट ब व गट क पूर्व परीक्षेसाठी नवीन उपक्रम
✦GS मधील पाच विषयांची संपूर्ण ओळख आणि अभ्यासाचे नियोजन
✦मोफत Lecture Series Youtube Channel आणि स्पार्क अकॅडमी मोबाइल App वर Upload करण्यात आली.















# स्पार्क अकॅडमी मोडयूल बॅचेस २०२५ -२६

✦ MPSC 2025 आणि 2026 साठी स्पार्क अकॅडमी App वर अल्प शुल्कामध्ये **Modules (Subjectwise Courses)** उपलब्ध करण्यात आले.

✦ **वैशिष्ट्ये :**

✦ ऑनलाइन आणि रेकॉर्डेड स्वरूपात.

✦ परीक्षाभिमुख मार्गदर्शन

✦ संपूर्ण अभ्यासक्रम

**इतिहास**

**मोडयूल बॅच**

**Science & Technology**

**मोडयूल बॅच**

**MPSC & UPSC**

**पर्यावरण**

**मोडयूल बॅच**

**2025-2026**

**सामान्य विज्ञान**

**मोडयूल बॅच**









# MPSC राज्यसेवा २०२४- मुलाखत बॅच शुभारंभ

## मुलाखतीचा कानमंत्र
## विशेष सत्र
## श्री. मुकुंद होन (शासकीय कामगार अधिकारी)

या सत्राच्या माध्यमातून इंटरव्ह्यु टॉपर श्री. मुकुंद होन यांनी मुलाखतीची संपूर्ण तयारी कशी करावी याचे सखोल मार्गदर्शन केले .

१. प्रभावी First Impression चे तंत्र
२. Presence of Mind चे महत्त्व
३. Bio-data आधारित स्मार्ट तयारी
४. संतुलित व नेमकी उत्तरशैली
५. Selection साठी योग्य Attitude










# मुलाखत बॅच - अभ्यास भेट

**स्थळ: फरासखाना पोलीस स्टेशन**

---

## मार्गदर्शक: प्रशांत भस्मे सर ( वरिष्ठ पोलीस निरीक्षक)

✦पोलीस प्रशासनाची कार्य पद्धती
✦पोलीसांसमोरील आव्हाने
✦महिला पोलिसांच्या समस्या
✦पोलीस स्टेशन मधील LIB, DO, Store Room, E-Post , Crime Registry, FIR>, Charge Sheet इत्यादींची माहिती.










# मुलाखत बॅच - अधिकारी संवाद सत्र (ऑनलाईन)

## मार्गदर्शक : डॉ. शिवाजी जगताप (उपजिल्हाधिकारी )

✦उपजिल्हाधिकारी पदाविषयी संपूर्ण मार्गदर्शन
✦कार्यकक्षा माहिती
✦अनुभव कथन
✦शंका निरसन








# मुलाखत बॅच - अधिकारी संवाद सत्र (ऑनलाईन)

## मार्गदर्शक : प्रणील गिल्डा (सहायक पोलीस आयुक्त)

✦सहायक पोलीस आयुक्त पदाविषयी संपूर्ण मार्गदर्शन
✦कार्यकक्षा माहिती
✦अनुभव कथन
✦शंका निरसन









# मुलाखत बॅच मार्गदर्शन सत्र

## विषय: मुलाखतीचा कंटेंट आणि लँग्वेज
## मार्गदर्शक: स्वागत दरख ( शैक्षणिक संचालक )

✦उत्तरांमध्ये स्पष्टता आणि योग्य templates चा वापर
✦विषयाचे ज्ञान , शब्दांची निवड व योग्य संवाद शैली
✦विविध प्रश्न प्रकार, त्याप्रमाणे उत्तरांची रचना









# अभिरूप मुलाखत सत्र - १
## दि. २१ ऑगस्ट

✦**मुलाखत पॅनल**
✦प्रदीप भांडारे (भारतीय वनसेवा AIR - ९०)
✦महेश येलगट्टे ( उपजिल्हाधिकारी Rank-१६)
✦स्वागत दरख ( शैक्षणिक संचालक)

**विद्यार्थी संख्या : ०६**










---

# अभिरूप मुलाखत सत्र - २

✦**मुलाखत पॅनल**
✦महेश येलगट्टे (उपजिल्हाधिकारी रँक ०६ )
✦सूरज वागसकर ( उपशिक्षणअधिकारी )
✦स्वागत दरख ( शैक्षणिक संचालक)

**विद्यार्थी संख्या : ०८**








# अभिरूप मुलाखत सत्र - ३

## दि. ०१ सप्टेंबर

✦**मुलाखत पॅनल :**
✦प्रदीप भंडारे (भारतीय वनसेवा )
✦महेश येलगट्टे (उपजिल्हाधिकारी रँक ०६ )
✦स्वागत दरख (शैक्षणिक संचालक)

**विद्यार्थी संख्या : ०४**










---

# अभिरूप मुलाखत सत्र - ४

## दि . १३ सप्टेंबर

✦**मुलाखत पॅनल :**
✦प्रदीप भंडारे (भारतीय वनसेवा)
✦मुकुंद होन (शासकीय कामगार अधिकारी)
✦स्वागत दरख (शैक्षणिक संचालक)

**विद्यार्थी संख्या : १६**









# अभिरूप मुलाखत सत्र - ५

## दि . १४ सप्टेंबर

✦**मुलाखत पॅनल :**
✦प्रदीप भंडारे (भारतीय वनसेवा)
✦मुकुंद होन (शासकीय कामगार अधिकारी)
✦स्वागत दरख (शैक्षणिक संचालक)

**विद्यार्थी संख्या : १७**










---

# अभिरूप मुलाखत सत्र - ६

## दि . २१ सप्टेंबर

✦**मुलाखत पॅनल :**
✦प्रदीप भंडारे ( भारतीय वनसेवा)
✦सूरज वागसकर ( उपशिक्षणअधिकारी )
✦उज्वला टिंगरे ( सहायक आयुक्त राज्यकर )
✦तुषार नांगूरडे (राज्यकर निरीक्षक)

**विद्यार्थी संख्या : १२**









# अभिरूप मुलाखत सत्र - ७

## दि . २१ सप्टेंबर

✦**मुलाखत पॅनल :**

✦प्रदीप भंडारे ( भारतीय वनसेवा)
✦प्रिया गोरखे (मुख्य अधिकारी )
✦प्रा. श्रुती गुजर ( संस्थापक, MPSC Insight )

**विद्यार्थी संख्या : ११**









---

# अभिरूप मुलाखत सत्र - ८

## दि . २७ सप्टेंबर

✦**मुलाखत पॅनल :**

✦प्रदीप भंडारे ( भारतीय वनसेवा)
✦प्रिया देहेडकर (सहायक आयुक्त राज्यकर )
✦स्वागत दरख ( शैक्षणिक संचालक )

**विद्यार्थी संख्या : १४**








# अभिरूप मुलाखत सत्र - ९

## दि. ०४ ऑक्टोबर २०२५

✦**मुलाखत पॅनल :**

✦संघरत्न सरोदे (शिक्षण अधिकारी, वर्ग अ)
✦सूरज वागस्कर (उपशिक्षणाधिकारी)
✦स्वागत दरख (शैक्षणिक संचालक)

**विद्यार्थी संख्या : १४**










---

# अभिरूप मुलाखत सत्र - १०

## दि. ११ ऑक्टोबर २०२५

✦**मुलाखत पॅनल :**

✦संघरत्न सरोदे (शिक्षण अधिकारी, वर्ग अ)
✦प्रदीप भंडारे ( भारतीय वनसेवा )
✦स्वागत दरख (शैक्षणिक संचालक)

**विद्यार्थी संख्या : ०७**









# अभिरूप मुलाखत सत्र - ११

## दि. २६ ऑक्टोबर २०२५

✦**मुलाखत पॅनल :**
✦प्रदीप भंडारे ( भारतीय वनसेवा )
✦स्वागत दरख (शैक्षणिक संचालक)

## विद्यार्थी संख्या : ०५





### Sparc Academy

राज्यसेवा २०२४ मुलाखत बॅच सांख्यिकीय आढावा

| CATEGORIES | VALUES |
|---|---|
| ➢ TOTAL REGESTRATION | 167 |
| ➢ TOTAL MOCK TAKEN | 108 |
| ➢ MOCK NOT GIVEN BY CANDIDATE | 59 |
| ➢ MOCK GIVEN BY CANDIDATE BUT NOT SELECTED | 49 |
| ➢ MOCK GIVEN BY CANDIDATE AND SELECTED | 59 |
| ➢ CLASS 1 POST OFFICERS | 36 |
| ➢ CLASS 2 POST OFFICERS | 23 |
| ➢ SELECTED MALE OFFICERS | 36 |
| ➢ SELECTED FEMALE OFFICERS | 23 |












# विशेष मार्गदर्शन सत्र

## कंबाईन संयुक्त गट ब पूर्व परीक्षा
## मार्गदर्शक:- वैभव मगर (रँक ५५, STI- २०२४)

✦३० दिवसांची अभ्यासाची रणनीती
✦शेवटच्या दिवसांमध्ये संपूर्ण आणि जलद रिवीजन
✦गुणवाढीसाठी टिप्स व ट्रिक्स








# विशेष सत्र - राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२५

✦SPARC ACADEMY यूट्यूब चॅनेल वर राज्यसेवा मुख्य परीक्षेच्या अंतिम टप्प्याच्या तयारीसाठी विशेष लाईव्ह लेक्चर आयोजित केले होते.

✦

✦वरद पेशकार (EPFO class1अधिकारी) यांनी अतिशय सोप्या आणि प्रभावी शैलीत, विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त आणि महत्त्वाचे मार्गदर्शन केले.






# १४ एप्रिल-
# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती





## महामानवाच्या कार्याला वंदन

### प्रा. डॉ. गणेश राऊत यांच्या व्याख्यानाला वारसाप्रेमींची दाद

म. टा. प्रतिनिधी, पुणे

प्रा. डॉ. गणेश राऊत

'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वंचितांच्या उद्धारासाठी केलेले कार्य आणि त्यांच्याविषयी बाबासाहेबांना असणारी तळमळ सर्वांनी लक्षात ठेवली पाहिजे. 'रूढ सामाजिक व्यवस्थेला छेद देण्याचे अत्यंत मोलाचे काम बाबासाहेबांनी केले,' अशा शब्दांत पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचा गौरव केला,' अशी आठवण सांगून प्रा. डॉ. गणेश राऊत यांनी बाबासाहेबांच्या कार्यकर्तृत्वाची माहिती दिली. निमित्त होते, हेरिटेज वॉक या उपक्रमात आयोजित वारसा व्याख्यानाचे.

'वर्शिप अर्थ फाउंडेशन', 'क्लब हेरिटेज आणि 'एच. व्ही. देसाई महाविद्यालय'चा इतिहास विभाग यांच्यातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'महाराष्ट्र टाइम्स' या उपक्रमाचा 'मीडिया पार्टनर' आहे. 'स्पार्क ॲकॅडमी'च्या सहकार्याने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. अध्यक्षस्थानी मनीषा नर्डेकर होत्या. या वेळी राऊत यांनी बाबासाहेबांबद्दल विविध व्यक्तींनी नोंदविलेल्या आठवणींचा पट उलगडला.

बागकाम आणि कुत्रे पाळण्याचा छंद, निसर्ग आणि वाचनाचा छंद, अशा चार छंदांमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर कसे दिसतात, हेही त्यांनी दाखवून दिले. 'शिक्षण हे शस्त्र आहे, असे त्यांनी नेहमीच सांगितले आणि या शस्त्राच्या आधारेच त्यांनी समाज बदलण्याचे प्रयत्न केले. कुटुंबनियोजन कार्यक्रमाचा प्रसार सरकारी पातळीवर करावा, अशी मागणी १९३८मध्ये करणे, हे बाबासाहेबांच्या दूरदृष्टीचे उदाहरण आहे,' असे सांगून राऊत म्हणाले, 'अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठाने माजी विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आवर्जून केला, त्यात बाबासाहेबांचा सहभाग होता. शोषित वर्गाला काही शिकवायचे असेल, तर मदत मागणारे याचक बनविण्यापेक्षा त्यांना आत्मसन्मान शिकवा, असेही बाबासाहेबांनी आवर्जून नमूद केले होते. मंत्रिपद स्वीकारल्यानंतर त्यांनी कोणतेही नेत्याचे खासगी आणि वैयक्तिक आयुष्य सारखेच असले पाहिजे, अन्यथा तो त्याच्या कार्य-कर्तव्यात अपयशी ठरतो, असे म्हटले. आपल्या उत्पन्नातून दहा टक्के वाटा पुस्तकांवर खर्च केला पाहिजे, असे त्यांचे मत होते. आपले संविधान कागदावर विषमतेचा समूळ नाश करील यात शंका नाही; पण त्याचा विषाणू जवळपास पुढील शंभर वर्षे भारतात राहील, तो लोकांच्या मनात खोलवर रुजला आहे,' असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली. उमेश पोटे यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त वारसा व्याख्यानाला उपस्थित श्रोते.






✦१४ एप्रिल २०२५ – डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त अकॅडमीमध्ये प्रा. डॉक्टर गणेश राऊत यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

✦आपल्या व्याख्यानातून त्यांनी महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकर्तृत्वाची माहिती दिली.

✦तसेच बाबासाहेबांबद्दल विविध व्यक्तींनी नोंदविलेल्या आठवणींचा पट उलगडला आणि बाबासाहेबांचे वेगळे पैलू नमूद केले.

✦स्पार्क अकॅडमीच्या विद्यार्थ्यांसोबतच हेरिटेज वॉक क्लबचे काही ज्येष्ठ सदस्य देखील व्याख्यानासाठी उपस्थित होते.

# क्रीडादिन - क्रिकेट स्पर्धा

दि. ६ ऑगस्ट २०२५ रोजी स्पार्क अकॅडमीचा क्रीडादिन उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित्त क्रिकेट सामने आयोजित करण्यात आले.

✦ दैनंदिन अभ्यास आणि परीक्षांच्या धकाधकीतून थोडा विरंगुळा मिळावा म्हणून SPARC Academy & Study Center च्या विद्यार्थी आणि स्टाफने एक उत्साही क्रिकेट सामना खेळला.

✦ अशा उपक्रमांमुळे टीमवर्क, क्रीडाभावना आणि एकमेकांशी मजबूत नातेसंबंध निर्माण होतात.

✦ हा दिवस उत्साह, सकारात्मकता आणि सुंदर आठवणींनी भरलेला होता - SPARC परिवाराचा खास टीम स्पिरिट पुन्हा एकदा अनुभवायला मिळाला.

## सहभागी: विद्यार्थी व स्टाफ









# ७९ वा स्वातंत्र्यदिन सोहळा

## प्रमुख उपस्थिती : मा. चंद्रकांत निनाळे

(सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, पुणे)

- ✦स्पार्क अकॅडमी मध्ये १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मा.चंद्रकांत निनाळे यांनी विद्यार्थ्यांसोबत सहज, सोप्या पद्धतीने संवाद साधला.
- ✦स्पर्धापरीक्षेच्या विद्यार्थ्यांनी कोणते गुण जोपासवे
- ✦छोट्या उदाहरणामधून प्रेरणादायी मार्गदर्शन.








# संवाद सत्र

✦विवेक स्पार्क फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पोहनेरकर यांनी स्पार्क अकॅडमीच्या विद्यार्थ्यांशी अनौपचारिक संवाद साधला.

✦विद्यार्थी वैयक्तिक परिचय
✦संस्था परिचय
✦अनुशासन आणि विद्यार्थ्यांकडून अपेक्षा












# संविधान दिन

## सहभागी: विद्यार्थी व स्टाफ

✦संविधान हा स्पर्धा परीक्षा अभ्यासक्रमाचा महत्वाचा घटक आहे.

✦स्पार्क अकॅडमी मध्ये परीक्षार्थी आणि सामान्य नागरिक म्हणून सर्वांना संविधानाचे महत्व कळावे म्हणून संविधान दिन साजरा करण्यात येतो.

✦या सत्रामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून प्रस्तावनेचे (Preamble) वाचन, घटनात्मक मूल्यांवर आधारित अर्थपूर्ण चर्चा आणि जबाबदार नागरिकत्व घडवण्यात आपल्या लोकशाही व्यवस्थेचे महत्त्व यावर चिंतन करण्यात आले.

✦आमचे शिक्षक आणि विद्यार्थी यांनी उत्साहाने सहभाग नोंदवून हा उपक्रम अधिक अर्थपूर्ण आणि प्रेरणादायी बनवला. SPARC Academy मध्ये आम्ही नागरिक जागरूकता, चिकित्सक विचारसरणी आणि आपल्या राष्ट्राच्या मूलभूत तत्त्वांबद्दल आदर निर्माण करण्यासाठी सतत कटिबद्ध आहोत.







# प्रजासत्ताक दिन २०२६

## सोमवार, दि .२६ जानेवारी २०२६

✦ऍड. विभावरी बिडवे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करून प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा झाला.संविधान या विषयावर विभावरी बिडवे यांनी अभ्यासपूर्ण मांडणी केली.

✦संविधान निर्मितीची पार्श्वभूमी
✦संविधानाचा पाया
✦प्रजासत्ताक राज्य म्हणजे काय
✦मूलभूत मानवी अधिकाराची उत्पत्ती कशी










# शिवजयंती उत्सव २०२६

## गुरुवार, दि . १९ फेब्रुवारी २०२६

✦अकॅडमी मध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. त्यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना शिवचरित्र अभ्यासक,व्याख्याते निनाद बेडेकर यांचे महाराष्ट्रातील दुर्ग बांधणी व्याख्यान दाखविण्यात आले.

✦

✦स्पर्धा परीक्षा अभ्यासाच्या अनुषंगाने भौगोलिक परिस्थिती आणि दुर्ग बांधणी, दुर्ग रचना, दुर्गाचे प्रकार, प्रत्येक दुर्गाचे वैशिष्ट्य

✦जागतिक वारसा यादीत समावेश का करण्यात आला याची स्पष्टता यावी या उद्देशाने

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समन्वयक सुशांत लगड याने केले.











# जागतिक महिला दिन २०२६

## मंगळवार, १० मार्च २०२६

✦स्पार्क अकॅडमी मध्ये जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून आशा भट (मंथन फाउंडेशनच्या संस्थापिका व अध्यक्षा) यांना सन्मानपत्र आणि समग्र वंदे भारत पुस्तक देऊन सन्मानित करण्यात आले.

✦आशा भट यांनी–

✦दुर्लक्षित महिला आणि त्यांच्या समस्या' या खूप संवेदनशील विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

✦महिला सक्षमीकरणमध्ये एक नागरिक आणि भावी प्रशासकीय अधिकारी म्हणून या विद्यार्थ्यांचे कर्तव्य आणि त्यांच्याकडून असलेल्या अपेक्षा याबद्दल खुली चर्चा केली.










# नारीशक्ती सप्ताह व्हिडीओ शृंखला

## मंगळवार, १० मार्च २०२६

✦SPARC ACADEMY यूट्यूब चॅनलवर जागतिक महिला दिनानिमित्त 'नारीशक्ती सप्ताह व्हिडीओ शृंखला' प्रस्तुत करण्यात आली.

✦अकॅडमीच्या सर्व समन्वयकांनी पुढाकार घेऊन कर्तृत्ववान, दिग्गज अशा ५ महिलांची माहिती देणारे व्हिडीओ बनवले.

✦या माध्यमातून महिला संशक्तीकारणासाठी जागृती करण्याचा प्रयत्न करण्यात आला .















# गुणवर्धन
# Interview Booster Workbook
# प्रकाशन समारंभ

प्रमुख उपस्थिती : महेश पोहनेरकर ( मुख्य  कार्यकारी संचालक )

- ✦MPSC मुलाखतीसाठी वर्कबुक ही नवीन संकल्पना महाराष्ट्रात सर्वप्रथम स्पार्क अकॅडमी च्या माध्यमातून साकारण्यात आली.
- ✦MPSC मुलाखातीची लिखित स्वरूपात तयारी करण्यासाठी अत्यंत उपयुक्त
- ✦मुलाखत बॅचच्या विद्यार्थ्यांसाठी नि:शुल्क उपलब्ध
- ✦वर्कबुक व्यतिरिक्त यावर्षी MPSC मुलाखतीमध्ये विचारलेले प्रश्न वर्गीकरण  करून स्वतंत्र पीडीएफ देण्यात आल्या








# गुणवर्धन

# नवीन उपक्रम

✦MPSC व UPSC साठी दररोज चालू घडामोडी (Daily News Headlines) हे सदर सुरू करण्यात आले .
✦SPARC Academy कडून साप्ताहिक लेख विश्लेषण (Weekly News Article Explainer) सुरू करण्यात आले .
✦MPSC Prelims २०२५ प्रश्न पत्रिकेची सर्वात संभाव्य उत्तरतालिका प्रकाशित करण्यात आली.

## Daily News Headlines For MPSC & UPSC

SPARC Academy

**THE HINDU 25TH DECEMBER 2025**

मुख्य पान (Front Page)
- अरावली संदर्भातील सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांची अंमलबजावणी करण्याचे केंद्राचे राज्यांना निर्देश.
- इस्रोने आतापर्यंतचा सर्वात मोठा व्यावसायिक दळणवळण उपग्रह कक्षेत प्रक्षेपित केला.

राज्ये (States)
- पुन्हा उद्‌भवलेल्या पक्षी फ्लूमुळे केरळमधील बदक पालन व्यवसाय धोक्यात.
- तेलंगणाला लवकरच आणखी पाच जीआय टॅग मिळण्याची शक्यता.

संपादकीय (Editorial)
- भारताच्या 'कामाच्या हक्का'चे जाणीवपूर्वक विघटन.
- नवे कामगार कायदे : असंघटित कामगारांसाठी धोका.

मत (Opinion)
- डिजिटल नार्सिसिझम (आत्ममुग्धता).
- उत्तर हिंद महासागरातील वादळांच्या पद्धतीत बदल घडवणारे चार प्रवाह.

मजकूर व संदर्भ (Text & Context)
- भारतामध्ये उत्पादन क्षेत्र का मागे पडले आहे?
- ब्युरो ऑफ पोर्ट सिक्युरिटी म्हणजे काय आणि त्याची भूमिका काय आहे?

बातम्या (News)
- 'एलएसीवरील तणाव कमी करण्याच्या नावाखाली चीन भारताशी संबंध नव्याने मांडत असून अमेरिकेशी जवळीक कमी करण्याचा प्रयत्न करत आहे'.
- आसाममधील हिंसाचारग्रस्त पश्चिम कार्बी आंगलोंगमध्ये लष्कर तैनात.
- हुंडा ही सांस्कृतिक सीमांपलीकडील सामाजिक वाईट प्रथा : सर्वोच्च न्यायालय.
- शारीरिक हालचालींमुळे स्तन कर्करोगाचा धोका कमी होतो : आयसीएमआर अभ्यास.

7261902020
Shri Mukund Bhavan Trust | 1105 | Ravivar Peth | Pune- 411002

SPARC Academy



## SPARC Academy Article Explainer

SPARC Academy

### अरावली पर्वतरांग बातमीत का?

नोव्हेंबर 2025 मध्ये भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने अरावली टेकड्यांची व्याख्या करताना असे स्पष्ट केले की **स्थानिक भूभागापेक्षा 100 मीटर किंवा त्याहून अधिक उंची असलेले भागच अरावली पर्वतरांग म्हणून गणले जातील.** या निर्णयामुळे कायदेशीर संरक्षण कमकुवत होऊ शकते, अशी चिंता व्यक्त केली जात आहे.

### अरावली पर्वतरांग विषयी

अरावली पर्वतरांग (Aravalli Range) ही पृथ्वीवरील सर्वात प्राचीन पर्वतरांगांपैकी एक आहे.
ही पर्वतरांग उत्तर-पश्चिम भारतातील एक महत्त्वाचा भौगोलिक विभाग तयार करते.

भूवैज्ञानिक काळात मोठ्या प्रमाणावर झीज झालेली असली, तरीही ही पर्वतरांग आजही:

- हवामानावर प्रभाव टाकते,
- जलप्रवाह प्रणाली नियंत्रित करते,
- खनिज संपत्तीचा मोठा स्रोत आहे,
- पर्यावरणीय संतुलन राखते,
- तसेच मानवी वस्तीच्या पद्धतींवर प्रभाव टाकते.

ही पर्वतरांग राजस्थान, हरियाणा, गुजरात आणि लगतच्या प्रदेशांमध्ये पसरलेली आहे.

### सर्वोच्च न्यायालयाची अरावली पर्वतरांगांबाबत व्याख्या व मार्गदर्शक तत्त्वे

**अरावली टेकड्यांची (Aravalli Hills) व्याख्या:**

स्थानिक परिसराच्या पातळीपेक्षा **100 मीटर किंवा त्याहून अधिक उंच असलेला कोणताही भूभाग** म्हणजे अरावली टेकडी.
स्थानिक उंची (Local relief) ही टेकडीभोवती असलेल्या सर्वात खालच्या समोच्च रेषेच्या (contour line) आधारे मोजली जाते.

7261902020
Shri Mukund Bhavan Trust | 1105 | Ravivar Peth | Pune- 411002

SPARC Academy

श्री मुकुंद भवन ट्रस्ट आणि विवेक स्पार्क फाऊंडेशन संचलित

## SPARC ACADEMY

### MPSC 2025 – PRE

### GS PAPER SET – C : ANSWER KEY

| QUE. NO. | ANS: OPTION | QUE. NO. | ANS: OPTION | QUE. NO. | ANS: OPTION | QUE. NO. | ANS: OPTION |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1 | 26 | 3 | 51 | 2 | 76 | 4 |
| 2 | 1 | 27 | 1 | 52 | 1 | 77 | 1 |
| 3 | 2 | 28 | 3 | 53 | 2 | 78 | 3 |
| 4 | 3 | 29 | 1 | 54 | 1 | 79 | 4 |
| 5 | 2 | 30 | 1 | 55 | 4 | 80 | 2 |
| 6 | 3 | 31 | 1 | 56 | 4 | 81 | 4 |
| 7 | 3 | 32 | 2 | 57 | 1 | 82 | 3 |
| 8 | 2 | 33 | 2 | 58 | 3 | 83 | 2 |
| 9 | 2 | 34 | 4 | 59 | 2 | 84 | 2 |
| 10 | 2 | 35 | 4 | 60 | 3 | 85 | 4 |
| 11 | 4 | 36 | 4 | 61 | 1 | 86 | 4 |
| 12 | 2 | 37 | 3 | 62 | 4 | 87 | 1 |
| 13 | 2 | 38 | 3 | 63 | 1 | 88 | 3 |
| 14 | 3 | 39 | 1 | 64 | 2 | 89 | 2 |
| 15 | 4 | 40 | 1 | 65 | 3 | 90 | 2 |
| 16 | 2 | 41 | 1 | 66 | 4 | 91 | 2 |
| 17 | 3 | 42 | 2 | 67 | 4 | 92 | 2 |
| 18 | 3 | 43 | 2 | 68 | 4 | 93 | 4 |
| 19 | 3 | 44 | 1 | 69 | 3 | 94 | 4 |
| 20 | 2 | 45 | 4 | 70 | 4 | 95 | 4 |
| 21 | 4 | 46 | 2 | 71 | 1 | 96 | 1 |
| 22 | 2 | 47 | 4 | 72 | 1 | 97 | 3 |
| 23 | 1 | 48 | 2 | 73 | 3 | 98 | 1 |
| 24 | 3 | 49 | 2 | 74 | 4 | 99 | 4 |
| 25 | 1 | 50 | 1 | 75 | 3 | 100 | 1 |

# सदिच्छा भेट







| | |
|---|---|
| सागर वाघमारे (तहसीलदार)<br>आणि किशोर मराठे (OSD) | शुभांगी गोरे (विद्युत सहायक) |







| | |
|---|---|
| रेवणसिद्ध घोगरे<br>(कनिष्ठ अभियंता PWD) | प्रथमेश होळकर<br>(ग्रामपंचायत अधिकारी) |

# सदिच्छा भेट

# प्रा. अमेय महाजन

✦ ( संचालक जागृती स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र , टिटवाळा) यांनी स्पार्क अकॅडेमी ला सदिच्छा भेट दिली.

## पुढील विषयांवर चर्चा झाली –

✦स्पर्धा परीक्षा सदयस्थिती
✦संयुक्त उपक्रम
✦समन्वयक मार्गदर्शन



# SPARC अभ्यासिका







# प्रवेश २०२५-२६




## ✦ एकूण प्रवेशाचा आढावा (२०२५–२६)

✦ सन २०२५–२६ या शैक्षणिक वर्षात SPARC Academy मध्ये प्रवेशाची स्थिती एकूण समाधानकारक राहिली आहे.

✦ वर्षभरात विद्यार्थ्यांची संख्या तुलनेने स्थिर असून काही महिन्यांत लक्षणीय वाढ दिसून आली.

✦ मुलांची संख्या (Boys) वर्षभरात सातत्याने जास्त राहिली असून, एप्रिल ते जुलै दरम्यान प्रवेशामध्ये वाढ होऊन जुलै महिन्यात उच्चांक गाठला. त्यानंतर काही प्रमाणात घट झाली असली तरी पुढील महिन्यांत पुन्हा स्थिरता दिसून आली.

✦ मुलींची संख्या (Girls) तुलनेने कमी असली तरी वर्षाच्या उत्तरार्धात (विशेषतः फेब्रुवारी व मार्च) वाढ होत असल्याचे दिसते, जे सकारात्मक संकेत आहे.

✦ एकूण प्रवाह (Trend) पाहता, वर्षाच्या सुरुवातीला प्रवेशामध्ये वाढ, मध्यंतरात थोडी घट आणि शेवटच्या टप्प्यात

# स्पार्क अकॅडमी यूट्यूब चॅनल
# वार्षिक विश्लेषण






# वार्षिक विश्लेषण २०२५-२६

✦ Views (१.२१ लाख)

✦ Watch Time (७,१८६ hrs)

✦ Subscribers (६४४)

✦ SPARC Academy YouTube Channel संपूर्ण विश्लेषण २०२३ ते मार्च २०२६

✦ **Views Analysis**

✦ ४.७३ लाख tiews म्हणजे चॅनलला विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. विशेषतः MPSC/स्पर्धा परीक्षा क्षेत्रात हे चांगले Organic Reach दर्शवते.

✦ **Watch Time Analysis**

✦ ४३,९२३ तास Watch Time हा खूप मजबूत आकडा आहे.

✦ याचा अर्थ :

✦ विद्यार्थी व्हिडिओ पूर्ण पाहतात

✦ Content Quality चांगली आहे

✦ Long-form educational content प्रभावी आहे

✦ YouTube Monetization साठी हा Watch Time अत्यंत सकारात्मक आहे.

✦ **Subscriber Growth**

✦ ६,५००+ Subscribers

✦ Loyal Audience तयार होत आहे

✦ Academy Brand Trust वाढत आहे

✦ नियमित Content Upload फायदा देत आहे.

✦ **Impressions Analysis**

✦ ६० लाखांपेक्षा जास्त Impressions म्हणजे:

✦ YouTube Algorithm तुमचे व्हिडिओ Push करत आहे

✦ Thumbnail आणि Title लोकांपर्यंत पोहोचत आहेत.

# SPARC Academy Social Media Platform Links

**Official Website -**
**thesparcacademy.com**

**Telegram -**
**t.me/Sparcacademyupscmpsc**

**Instagram -**
**instagram.com/sparc_academy_?igsh=NHUwaGNrZmJhcHNo**

**App Link -**
**edumartin.page.link/JRWS**

**You Tube Link -**
**https://youtube.com/@sparcacademy?si=KGCFrYazloXILygd**